# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
## नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
## दिनांक १५/०७/२०१७ (शनिवार)
## (सकाळ)

---

## घरफोडी

**पो.स्टे. खापरखेडा** :- अंतर्गत ०५ किमी अंतरावर मौजा पांडे ले आऊट, नॅशनल हायवे ४७ ला लागुन असलेले दुकान येथे दिनांक १३/०७/२०१७ ते १४/०७/२०१७ चे रात्री दरम्यान कोणीतरी अज्ञात आरोपीने फिर्यादी नामे - नरेश रामदासजी सावरकर, वय ३८ वर्ष, रा. वार्ड नं. २ पिपळा डागबंगला यांच्या इंद्रायणी ईन्टरप्राईजेस कंपनीच्या दुकानाचे शटर तोडुन आत प्रवेश करून दुकानातुन फिलीप्स कंपनीचा २० इंच एल.इ.डी. टिव्ही, गल्यातील नगदी ४००/-रू. असा एकुण किंमती १६,०००/- रुपयांचा माल तसेच समोरील पानठेल्यातील तेलाच्या १५ ऑईलच्या डबक्या आणि टायर टयुब ४,०००/-रू. असा एकुण किंमती २०,४००/- रुपयांचा मुद्देमाल चोरुन नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार श्री. नामदेव धांडे हे करीत आहे.

## मोटरसायकल चोरी

**पो.स्टे. बोरी** - अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावर बुटीबोरी, कोशर पॅलेस पार्कीग येथे दिनांक १४/०७/२०१७ चे १२.०९ वा. दरम्यान कोणीतरी अज्ञात आरोपीने नमुद घटनास्थळाहुन फिर्यादी नामे- उशांत धनराज बडोले, वय २० वर्ष, रा. लाखनी, जिल्हा भंडारा ह.मु. कोशर पॅलेस लक्ष्मी अपार्टमेंट, जवळ बोरी यांची मोटरसायकल क्र. एम.एच. - ३६/आर - ०८०७ किंमत २५,०००/- रुपयाचा चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे अज्ञात आरोपी विरुध्द कलम ३७९ भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेण्यात येत आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक श्री. नारायण राठोड हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**